REGISTERED No. B. 3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ | पुणें, बुधवार तारीख २० नोव्हेंबर १९४६ | अंक ४५

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

# विविध माहिती

**ब्रिटानिया बिस्किट कं. लि.**—ह्या कंपनीनें मार्च १९४६ अखेर संपलेल्या वर्षी ८३ लक्ष रुपयांची विक्री केली. भागीदारांस १०% डिव्हिडंड दिलें. १० रुपयांच्या शेअरची बाजारांत किंमत ३४ रु. आहे.

**मालवाहू आगबोटींच्या मालकींत अमेरिकेचें नेतृत्व**—१९३९ सालीं जगांतील एकुण मालवाहू आगबोटींपैकीं १४% आगबोटी अमेरिकेच्या होत्या; आतां ५१% आगबोटींवर अमेरिकेची मालकी आहे. ३० जून, १९४६ अखेरचे प्रमुख आकडे खालीलप्रमाणें आहेतः—

| देश | आगबोटी | लक्ष टन |
|---|---|---|
| अमेरिका | ४,८६१ | ५०४ |
| ब्रि. साम्राज्य | ३,१५९ | २४० |
| नॉर्वे | ६०७ | ४५ |
| स्वीडन | ४४३ | २२ |
| रशिया | ४८७ | २६ |

**वैमानिक प्रवास आणि विमा**—गेल्या कांहीं दिवसांत विमान अपघातांची संख्या बरीच वाढल्यामुळें प्रवाशांच्या आयुर्विम्याच्या हप्त्याच्या दरांत वाढ करावी की काय असा प्रश्न ब्रिटिश कंपन्यापुढें उपस्थित झाला आहे. शिवाय अपुऱ्या उजेडांत विमानतळावर उतरण्यासाठीं आवश्यक त्या सोयी कांहीं विमानतळांवर नाहींत असें समजल्यामुळें तर त्या प्रश्नाला अधिकच महत्त्व आलेलें आहे.

**ब्रिटिश खलाशांची चाचेगिरी**— गेल्या महायुद्धांत फ्रान्सचा पाडाव झाल्यावर, पुन्हां फ्रान्समध्यें उतरण्यासाठीं ब्रिटिश सैनिकांना खास शिक्षण देण्यांत आलें. त्यांना 'कमांडोज' असें म्हणत. आतां युद्ध संपल्यावर या निष्णात खलाशांनीं फ्रान्समधून पिण्याची दारू इंग्लंडमध्यें चोरून आणण्याचा सपाटा चालविला आहे. त्यांच्याजवळ अत्यंत वेगवान् अशा वाफेच्या छोट्या बोटीही आहेत; किनाऱ्यावर छापे घालण्याचें शिक्षण तर त्यांना मिळालेंच आहे. त्यामुळें त्यांचा बंदोबस्त करून दारूच्या काळ्या बाजाराला आळा घालणें कठीण होऊन बसलें आहे.

**अल्युमिनचा डाक बसवितां आला तर**— फळें, मासे, दूध वगैरे टीनच्या सीलबंद डब्यांतून परदेशी पाठविण्याचा प्रघात आहे. टिनच्या डब्याच्या ऐवजीं अल्युमिनचा उपयोग करता येईल काय? तूर्त तरी ही गोष्ट शक्य नाहीं. कारण अल्युमिनियमचा डबा डाक देऊन बंद करतां येत नाहीं. पण अल्युमिनियमचा डाक बसवितां आला तर टिनच्या डब्या ऐवजीं तेंच वापरलें जाईल. कारण एक तर तें टिनपेक्षा फार स्वस्त आहे; आणि दुसरें तें गंजत नाहीं.

**ऑस्ट्रेलिआंत युरेनिअम**—दक्षिण ऑस्ट्रेलिआच्या सरकारनें खनिज संपत्तीचा शोध करण्यासाठीं एक त्रैवार्षिक योजना आंखली आहे. जगाच्या दक्षिण गोलार्धांत फक्त ऑस्ट्रेलियांतच युरेनिअम सांपडतो असें म्हणतात. अणुबाँबच्या शोधापासून युरेनिअमला अधिकच महत्व प्राप्त झालें असलें तरी ऑस्ट्रेलिआच्या या संपत्तीचा शोध ४० वर्षांपूर्वी रेडिअम तपासाच्या निमित्तानें लागला होता.

**हिंदी रेल्वेसाठीं ऑस्ट्रेलिअन बनावटीचीं चाकें**—दक्षिण ऑस्ट्रेलिआंतील रेल्वेच्या कारखान्यांतून सिलोन व हिंदुस्थानमधील रेल्वेसाठीं चाकें व चाकांचे कणे तयार करण्यांत येत आहेत.

**रुपयाची सम ('पार') किंमत**—रुपयाची 'सम ('पार')' किंमत ·००८६३५७ औंस सोन्याइतकी असल्याचें हिंदुस्थान सरकारनें इं. मोनेटरी फंडास कळविलें आहे. रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाच्या सल्ल्यास धरूनच ही किंमत निश्चित करण्यांत आली आहे. शनवार, ता. ९ रोजीं रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाची दिल्ली येथें सभा भरली होती, तिला सर चिंतामण देशमुख हे उपस्थित होते.

**मद्रास प्रांतांत पेट्रोल कर वाढणार**—मद्रास सरकार आपलें उत्पन्न वाढविण्यासाठीं पेट्रोलवरील कर दुप्पट करणार आहे. सध्याचा दर रुपयास दीड आणा एवढा आहे.

**बँकेस फसविल्याच्या आरोपावरून अटक**—अर्जांत खोटी माहिती लिहून रिझर्व्ह बँकेकडून मोठ्या चलनी नोटांची मोड घेतल्याचीं कित्येक उदाहरणें नजरेस आलीं आहेत, त्यांबाबत पोलिस तपास चालू आहे. अशा रीतीनें रिझर्व्ह बँकेकडून ३,००,००० रुपये घेतल्याचे आरोपावरून १२ इसमांस नुकतेंच पकडण्यांत आलें आहे. त्यांचा म्होरक्या गणला जाणारा इसम अद्याप सांपडलेला नाहीं.

**अमेरिकन सैनिकांच्या युद्धकालीन भार्या**—अमेरिकन सैनिकांनीं युरोपांत केलेले सुमारें १२,००० विवाह रद्द झाल्यासारखेच आहेत कारण, त्या सैनिकांनीं आपल्या बायका अमेरिकेस बरोबर नेलेल्या नाहींत. कित्येकांनीं आपली पहिली पत्नी असतांनाच युरोपांत विवाह केलेले आहेत तर कित्येकांनीं अमेरिकेंतील दिलेले पत्ते खोटे आहेत.

**गुजराथेंत सरकारी व्यवस्थेखालील वीजपुरवठा**—पुढील कांहीं वर्षांत सर्व हिंदुस्थानभर वीजउत्पादन व पुरवठा सरकारी व्यवस्थेखालीं घेण्यांत यावयाचा आहे. त्यासाठीं प्रांतिक सरकारांना अधिकार देणाऱ्या तरतुदी प्रचलित इलेक्ट्रिसिटी ॲक्टमध्यें करण्यासाठीं एक बिल मध्यवर्ती विधिमंडळांत लवकरच मांडण्यांत यावयाचें आहे. मुंबई सरकारच्या ग्रिड सिस्टिमच्या योजनेनुसार वीजउत्पादन सरकारी व्यवस्थेखालीं घेऊन जनतेला वीजपुरवठा नियंत्रित दरानें करण्यांत येणार आहे. या योजनेचें पहिलें पाऊल पुढील वर्षांत उत्तर गुजराथेंत टाकण्यांत येईल तेथें प्रथम सरकारी व्यवस्थेखालीं वीजपुरवठा करण्यांत येईल. ग्रिड योजनेसाठीं कांहीं कोटी रुपये खर्ची पडतील. सरकारच्या कामासाठीं सुमारें ५ ते ७ तज्ज्ञांचें इलेक्ट्रिसिटी बोर्ड नेमणार आहे.

**फिरत्या सिनेमांवर नियंत्रण**—जेथें आगोदरच सिनेमा थिएटरें चालू आहेत, अशा ठिकाणीं फिरते सिनेमा जाऊन त्यांच्याशीं अनिष्ट स्पर्धा करतात. त्यावर नियंत्रण घालण्यासाठीं मद्रास सरकारनें फिरत्या सिनेमांच्या लायसेन्सचे बाबतींत ज्यास्त चौकशी करण्याचें ठरविलें आहे. मद्रास शहरांत कोणत्याहि फिरत्या सिनेमास प्रवेश मिळणार नाहीं आणि इतर ठिकाणीं जेथें एकापेक्षा अधिक थिएटरें असतील तेथें त्यांच्या चार मैलांचे टापूंत फिरते सिनेमा येऊं शकणार नाहींत.

**सेफ्टी रेझरचा प्रसार**—सेफ्टी रेझर कंपन्या सध्यां अत्यंत तेजींत आहेत. लष्करांतील लक्षावधि लोक आतां दररोज दाढी करूं लागले आहेत; पूर्वी रोजची दाढी त्यांना माहीत नव्हती. १९४५ च्या पहिल्या तिमाहींत जिलेट सेफ्टी रेझर कं. व अमेरिकन सेफ्टी रेझर कॉर्पोरेशन ह्यांना जितका नफा झाला, त्याच्या तिप्पट नफा १९४६ च्या पहिल्या तिमाहींत झाला.

**रेडिओ-टेलिफोन**—अमेरिका व रशिया ह्यांचेमध्यें रेडिओ-टेलिफोन दळणवळण सुरू झालें आहे. कोणीहि नागरिक तीन मिनिटांसाठीं १२ डॉलर देऊन बोलूं शकतो. रविवारीं ९ डॉलर पडतात.

**माल खपवण्यासाठीं वास**—अमेरिकेंतील सुमारें १०० प्रकारचे उद्योगधंदे वासाचा उपयोग करून आपल्या मालाचा उठाव वाढवण्याचा प्रयत्न करीत आहेत. बुटाच्या सोलला नैसर्गिक कातड्याचा वास देण्यांत येत आहे. न्यूयॉर्क येथील एका मोठ्या स्टोअरच्या दर्शनी भागावर सुवासिक द्रव्यांचा फवारा सोडला जात असतो. रंग, पॉलिश, मेण, रबर, कृमिनाशक द्रव्यें, ह्या सर्वांस आतां सुवास दिला जात आहे.

**ऐक्य औद्योगिक दीपावली विशेषांक**— 'ऐक्य' साप्ताहिकाचा सहावा सातारा जिल्हा औद्योगिक दीपावली विशेषांक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सातारा जिल्ह्याच्या दृष्टीनें त्यांत कोणत्या औद्योगिक सुधारणा व्हाव्या आहेत, ह्याची माहिती देणाऱ्या बोधप्रद लेखांचा समावेश करण्यांत आला आहे. 'ऐक्या' नें विशेषांकामार्फत मिळविलेला लौकिक प्रस्तुत अंकानें वाढविलाच आहे.

**ब्रिटनची अमेरिकेंतील खरेदी**—अमेरिकेनें ग्रेटब्रिटनला मोठें कर्ज दिलें असलें, तरी ग्रेटब्रिटन अमेरिकेच्या मालाची खरेदी हात आखडूनच करीत आहे. मालाच्या किंमती उतरण्याची ग्रेटब्रिटन वाट पहात आहे.

**कामाचे तास कमी; उत्पादनहि कमी**—कापडाच्या गिरण्यांतील कामाचे तास आठांवर आणल्यामुळें दरसाल सुमारें ७० कोटि वार कापड कमी तयार होईल.

# अर्थ

बुधवार, ता. २० नोव्हेंबर १९४६




संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रो. वा. गो. काळे


## एक अनुकरणीय उपक्रम

अमेरिकन राजकारणांत अमुक एकाद्या सार्वजनिक व्यक्तीचें वर्तन 'अन-अमेरिकन' आहे असा आरोप त्या व्यक्तीच्या प्रतिपक्षीयाकडून करण्यांत येत असतो. 'अन-अमेरिकन' या शब्दाचा अर्थ अर्थातच निरनिराळ्या वेळीं वेगवेगळा करण्यांत येतो व पुष्कळदां आरोप करणाऱ्या व्यक्तीला स्वतःला सुद्धा त्या शब्दाचा निश्चित अर्थ सांगतां येणार नाहीं. अमेरिकन संस्कृति ही एका खंड-प्राय व निसर्ग समृद्ध देशांत अनेक वंशाच्या लोकांनीं बनविलेली विचित्र गल्लत आहे. त्यामुळेंच कीं काय कधीं कधीं अमेरिकेंत चमत्कृतिपूर्ण सामाजिक घटना घडून येतात. ज्या अमेरिकेंतील उद्योगधंद्यांत जगांतील सर्वांत प्रचंड संप घडून येतात त्याच अमेरिकेंत १९२६ सालापासून अमेरिकन-लवाद-संस्था स्थापन झालेली असून तिचें कार्य क्षुद्र भांडणापासून तो आंतरराष्ट्रीय व्यापारांतील भांडणापर्यंत सर्वांचा निकाल लवादानें देण्याचें आहे. कोठेंही भांडण-तंटा उपस्थित झाला कीं दोन्ही पक्षांनीं आपआपल्या पक्षानें लवाद निवडून द्यावे व त्यांनीं दिलेला निकाल दोन्ही पक्षांनीं मान्य करावा; अशा तऱ्हेनें दर महिना २०० पर्यंत भांडणांचे निकाल संस्थेकडून देण्यांत येतात. हीं भांडणें संस्थेकडे येतात तीं दोन मार्गांनीं: एक म्हणजे भांडणारे पक्ष आपणहून संस्थेकडे लवाद नेमण्याची विनंती करतात; किंवा आपसांतील करारांतील करारान्वयें त्यांना लवादाकडे जावें लागतें. दोन्ही पक्षाकडून अशी विनंति आली कीं संस्था त्या पक्षाकडे लवादांची एक भली थोरली यादी पाठविते. या यादींत निरनिराळ्या धंद्यांतील उत्तम गणल्या गेलेल्या मोठमोठ्या तज्ज्ञांचीं नांवें असतात. नको असतील त्या लवादांचीं नांवें वादी-प्रतिवादी खोडून टाकतात व उरलेल्यापैकी कोणतीं नांवें मंजूर आहेत त्यांचा पसंतीच्या अनुक्रमानें क्रम लावतात. अशा रीतीनें लवाद निवडून झाले कीं दोन्ही पक्ष आपआपली बाजू लवादापुढें मांडतात व झटपट निकाल करून घेतात. या संस्थेनें १९२६ सालापासून २५ हजार भांडणें लवादानें मिटविलीं आहेत. संस्थेच्या कक्षेंत फौजदारी गुन्हे सोडून बाकी कोठलाही वाद येऊं शकतो. कामगार व कंपन्या यांच्यांतील कराराच्या भंगामुळें उद्भवणारे अनेक वादग्रस्त प्रश्न संस्थेनें लवादाकरवी सोडविले आहेत. कामाचे तास व वेतन हे प्रश्न मात्र अमेरिकन कारखानदार व कामगार-संघ सामुदायिक करारानें ठरवितात.

एकदा एका अमेरिकन चित्रपट निर्मात्यांत आणि नटांत वाद उत्पन्न झाला. या नटाला चित्रपटांत प्रमुख भूमिका दिलेली असतांना ऐन वेळीं दुसऱ्या दुय्यम भूमिकेचें काम सांगण्यांत आलें. अर्थातच नट 'सेट' वरील काम अर्धवट सोडून निघून गेला. हा प्रकार पहाटेच्या सुमारास झाला. आतां अशा वेळीं या भांडणाचा निकाल लवकर लागावा कसा ? आणि चित्रपटाचें काम पुढें चालावें कसें ? पण नटांच्या संघानें या अवेळीं लवाद संस्थेला टेलिफोन केला. झालें, लवाद संस्थेचीं चाकें फिरूं लागलीं; १० मिनिटांच्या आंत एक प्रसिद्ध चित्रपट निर्माता, एक वकील व एक पेढीवाला यांचें सहकार्य मिळविण्यांत आलें. या लवाद मंडळाला दोन्ही पक्षांनीं मान्यता दिली आणि चौकशीला प्रारंभ झाला. सुमारें अर्ध्या तासाच्या आंतच दोन्ही पक्षाच्या वकिलांचें म्हणणें ऐकून घेऊन लवाद-मंडळानें निकाल दिला. नटाबरोबर केलेल्या कराराप्रमाणें त्याला मुख्य भूमिकेचेंच काम दिलें पाहिजे हा मंडळाचा निकाल चित्रपट निर्मात्यानें मान्य केला व चित्रपटाचें काम बिनबोभाट पुढें चालू झालें.

पुष्कळदां भांडणाचें कारण क्षुल्लक असतांना इभ्रतीला बळी पडून भांडणें कोर्टापर्यंत जातात. अशा वेळीं लवाद मंडळाचा चांगला उपयोग होतो. असें एक गंमतीचें उदाहरण लवाद मंडळाच्या निवाड्यांतून देतां येण्यासारखें आहे. एका घरधनिणीनें आपल्या दिवाणखान्यांतील सतरंजी धुण्याकरिता दिली. धुवून परत आल्यावर ती सहा इंच आकसल्याचें आढळून आलें म्हणून तिनें सतरंजी ओढून पूर्वीसारखी करावी असा आग्रह कंपनीजवळ धरला, पण धुणाऱ्या कंपनीकडून तें काम कांहीं केल्या होईना, म्हणून घरधनिणीनें दुसऱ्या एका कंपनीकडून मूळच्या सतरंजीला ६ इंच पट्टा लावून घेतला. नंतर ती बाई गांवाला गेली असतांना पहिल्या कंपनीनें न कळत त्या सतरंजीला आणखी एक ६ इंचाचा पट्टा जोडला. गांवाहून परत आल्यावर घरधनीण अतिशय संतापली व तिनें बरीच मोठी नुकसानभरपाई मागितली. पण सुदैवानें धुण्याच्या आज्ञापत्रांत लवादाचें कलम होतें. त्यामुळें दोन्ही पक्ष भांडण लवादाकडे सोपविण्यास तयार झाले. लवाद मंडळानें यजमानिणीस ६३ डॉलर्स नुकसानभरपाई म्हणून देवविले. धुणाऱ्या कंपनीनेंही, प्रकरण कोर्टांत जातें तर अधिक महागांत पडतें असा विचार करून रक्कम मुकाट्यानें दिली. बाईंची इभ्रत कायम राहिली कंपनीचा खर्च वाचला आणि लवाद निवाड्यांत आणखी एका मजेदार निर्णयाची भर पडली.

## फॅक्टरी ॲक्टाचा १९४४ सालचा वार्षिक अहवाल

फॅक्टरी ॲक्टचा १९४३-१९४४ सालांतील अंमलबजावणीचा अहवाल इंडियन लेबर गॅझेटच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

१९४३ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील कारखान्यांची संख्या १३,२०९ होती ती १९४४ सालीं १४,०७१ वर गेली. ही वाढ मुख्यतः कायम स्वरूपाच्या कारखान्यांतच झाली आहे. हंगामी स्वरूपाच्या कारखान्यांची संख्या १९४३ सालीं ३,३३७ होती ती १९४४ सालीं कमी होऊन ३,३२५ वर गेली आहे. नवे कायम स्वरूपाचे कारखाने मुंबई प्रांतांत २७७, मद्रास प्रांतांत १९८ आणि संयुक्त प्रांतांत ८८ निघाले.

### कामगारांची संख्या

सर्व कारखान्यांत मिळून प्रतिदिवशीं सरासरीनें पुढीलप्रमाणें कामगार कामावर होते:—

| | १९४३ | १९४४ |
|---|---|---|
| पुरुष | २१,१३३,६२२ | २२,०९,५०३ |
| स्त्रिया | २,६२,२४४ | २,६९,७२० |
| अप्रौढ पुरुष | २४,६८७ | २६,६५९ |
| अप्रौढ स्त्रिया | ३,३६५ | ३,५२४ |
| मुलें | १०,५७४ | १,११,१९९ |
| मुली | १,९१० | २,१४७ |
| एकूण | २४,३६,३१० | २५,२२,७५३ |

१९४४ सालांतील कापसाच्या गिरण्यांतील रोजच्या कामगारांची सरासरी संख्या ६,६५, ६१३ होती व तागाच्या गिरण्यांतील ही संख्या २,८८,६६२ होती.

अहवालाच्या वर्षांत एकंदर हिंदुस्थानांत स्त्री-कामगारांची संख्या वाढली असली तरी मुंबई, अहमदाबाद यासारख्या शहरांतील स्त्री-कामगारांची संख्या घटलीच आहे. स्त्रीकामगारांची संख्या वाढली ती मुख्यतः छोट्या गांवांत, जेथें पुरुष कामगारांचा तुटवडा पडला तेथें, स्त्री-कामगार घेतले गेल्यामुळें वाढली.

स्त्रिया व मुलें यांना बेकायदेशीर रीत्या कामावर ठेवल्याबद्दल मुंबई प्रांतांत ८८ व सिंधमध्यें ३९ खटले भरण्यांत आले.

११,७१३ कारखाने या वर्षांत निदान एकदा तरी तपासले गेले व २,३६८ अजिबात तपासले गेलेच नाहींत. संयुक्त प्रांतांतील प्रत्येक कारखाना तपासला गेला.

# स्फुट विचार

## फ्रेंच विधिमंडळांत कम्युनिस्ट पक्षाची सरशी

मागतिक कॅथोलिक, सोशलिस्ट आणि कम्युनिस्ट या पक्षांच्या संगनमतानें नव्या फ्रेंच घटना–कायद्याप्रमाणें नुकत्याच ज्या निवडणुका फ्रान्समध्यें झाल्या त्यांत कम्युनिस्ट पक्षाचे सर्वांत अधिक उमेदवार निवडून आले आहेत. त्याच्या खालोखाल मागतिक कॅथॉलिक पक्षाचे आले असून फ्रेंच समाजवादी पक्षाच्या संख्येंत मात्र पूर्वीच्या मानानें घट झालेली आहे. घट या घटनेचा अर्थ निरनिराळे राजकीय गट निरनिराळा लावीत आहेत. फ्रान्समध्यें आतां कम्युनिस्ट व कम्युनिस्ट–विरोधी असे दोनच तट उघडपणें पडल्याचेंही सांगण्यांत येत आहे. नव्या निवडणुकींत पक्षोपक्षांना मिळालेल्या यशापयशाची कारणें बरीच खोलवर रुजलेली असली तरी फ्रान्समधील कामगारांच्या आर्थिक परिस्थितींत कम्युनिस्ट पक्षानें थोडी बहुत सुधारणा केल्यामुळेंच, त्या पक्षाला हा विजय मिळाला असावा असें मानण्यास भरपूर जागा आहे. तथापि कारणपरंपरेच्या खोल पाण्यांत न शिरतां फ्रान्समधील राजकारणाला कोणती दिशा लागणें शक्य आहे यासंबंधी विचार करतां येईल आणि तसा तो करणें पश्चिम युरोपच्या भवितव्याच्या दृष्टीनें महत्वाचेंही आहे. कॅथॉलिक पक्षानें नवीन सरकारांत भाग घेणें सोशालिस्ट पक्षाच्या धोरणावर अवलंबून आहे. कम्युनिस्ट–सोशलिस्ट यांची कार्यक्रमाबाबत एकी झाली तर मागतिक कॅथॉलिकांना नव्या सरकारांत स्थान रहाणार नाहीं हें उघडच आहे. तशी ती झाली नाहीं तर मात्र तिन्ही पक्षांचे संमिश्र सरकार बनविणें अपरिहार्य होऊन त्यामुळें फ्रेंच राजकरणाची अस्थिरता आहे अशीच राहील. फ्रान्समधील राजकारणाचा खरा गाभा देशांतील युद्धोत्तर पुनर्घटना लवकर करण्यांत सांठविलेला आहे. आर्थिक सुस्थिती जितकी लवकर येईल व ती आणण्यांत जो पक्ष धडाडी दाखवील त्याच पक्षाचें प्राबल्य अखेर टिकणार आहे. आर्थिक कार्यक्रमाच्या साम्याबाबत कम्युनिस्ट व सोशलिस्ट यांच्यांत तत्वाचे मतभेद असण्याचें कारण नाहीं, भेद साधनापुरताच असला तर राज्यकारभाराची धुरा वहातांना तो विरून जाण्याचा संभव आहे. फ्रान्समध्यें डाव्या गटांची एकी झाली व टिकली तर पश्चिम युरोपांतील पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाही राष्ट्रांत फूट पडली असें समजण्यांत हरकत नाहीं. या फुटीचे युरोपियन राजकारणांत फार दूरगामी परिणाम घडून आल्याखेरीज रहाणार नाहींत.

---

## कामगार संघांची प्रगति

हिंदुस्थानांतील कामगार संघाचा १९४४ सालापर्यंतचा अहवाल नुकताच पुरा करून हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केला आहे. १९४२–४३ सालांत सुमारें ६९३ कामगार संघ होते; त्यांची संख्या १९४३–४४ सालांत ८१८ वर गेली असून या संघांच्या समासदांची संख्या १९४२–४३ मधील ६,८५,२९९ या आंकड्यावरून ७,८०,९६७ वर गेली आहे. १९४२–४३ साली या सर्व संघांचे एकुण उत्पन्न १५,९६,९८४ रुपये होते ते १९४३–४४ सालीं २३,१८,७८० रुपयांवर गेले आहे. म्हणजे १९४४ सालांत सरासरीनें प्रत्येक कामगारामार्फत रु. २–१५–६ संघासाठीं मिळाले व प्रत्येक संघाचे सरासरी उत्पन्न ४,११५–९–१० रु. झालें. १९४३ सालचे हेच आंकडे रु. २–५–३ व रु. ३,२६५–१३–३ असे आहेत. या कामगार–संघांची वर्गवारी पुढीलप्रमाणें देता येईल.

| | १९४२–४३ | १९४३–४४ |
|---|---|---|
| (१) रेल्वे कामगार संघ | ८० | ८२ |
| कामगार संख्या | २,५४,५१० | २,६३,२६२ |
| (२) कापड गिरण्या | ९८ | १२२ |
| कामगार संख्या | १,६१,१३३ | २,२२,६६७ |

बाकीचे कामगार–संघ इतर उद्योग धंद्यांचे आहेत. पैकी सुमारे २५ टक्के संघांची सभासद संख्या १०० ते ३०० पर्यंत; १६ टक्के संघांची ३०० ते ५००; १८ टक्के संघांची ५०० ते १००० व २० टक्के संघांची १००० ते १०,००० असून सुमारें १८ कामगार संघांची समासद संख्या दहा हजारांचेहि वर आहे. अहवालाच्या सालांत सुमारे १३५ संघांची नोंदणी रद्द करण्यांत आली.

---

## कामगारांच्या अस्वस्थतेची कारण मीमांसा

कामगार जगतांतील सांप्रतच्या अवस्थतेबाबत चौकशी करण्यासाठी मुंबई सरकारनें एका समितीची नेमणूक केली आहे. प्रांतांतील प्रमुख औद्योगिक केंद्रांतील व विशेषतः मुंबई शहर, मुंबईचे उपनगर विभाग व पूर्व–पश्चिम खानदेश या ठिकाणच्या कामगारांच्या परिस्थितीची पहाणी या समितीमार्फत होणार आहे. श्री. टी. ई. वाटरफील्ड, आय्. सी. एस्. डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज हे या समितीचे अध्यक्ष, श्री. एस्. जी. मोनानी राजकीय व रोजगार खात्याचे सरकारी उपकार्यवाह, हे सभासद, व अहमदाबाद येथील असिस्टंट लेबर कमिशनर श्री. डी. जी. काळे हे सभासद व कार्यवाह नेमण्यांत आले आहेत. (१) युद्धकाळांतील व युद्धपूर्वकाळांतील कमाल उत्पादनाच्या मानानें सर्वसाधारण कारखान्यांचें व विशेषतः कापड गिरण्यांचें उत्पादन घटलें आहे काय? (२) उत्पादन असें घटलें असल्यास त्याचीं कारणें काय? (३) अनियमित हजेरी, गैरशिस्त वर्तन व दंगेखोर वृत्ति ही कामगारांत बेसुमार वाढली आहेत काय? (४) कामगारांच्या अलीकडील असंतोषाच्या निदर्शनांना अपुरी कमाई, सोयींचा अभाव व अन्याय्य वागणूक ही कितपत कारणीभूत झाली आहेत व (५) दुसऱ्या कांहीं गोष्टी याच्या बुडाशीं आहेत काय? असल्यास त्या कोणत्या? इत्यादि प्रश्नांच्या अनुरोधानें सदर चौकशीचें काम होणार आहे.

---

## दोनशें कोटींच्या नव्या भांडवल उभारणीस परवानगी

मर्यादित भांडवलाच्या कंपन्यांमध्यें गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलावर नियंत्रण राखण्याच्या हिंदुस्थान सरकारच्या योजनेच्या अंमलबजावणीचा आक्टोबर १९४५ ते जून १९४६ अखेर या काळांतील अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या काळांत २०९ कोटींच भांडवल उभारण्याची परवानगी ८९७ कंपन्यांनीं मिळून मागितली. एकूण १६५ कोटींचें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली आणि सुमारें ३३ कोटींचें भांडवल उभारण्याबाबत २१९ कंपन्यांना परवानगी नाकारण्यांत आली. या आंकड्यांत जो फरक दिसत आहे त्याचें कारण कांहीं कंपन्यांना अंशतः परवानगी देण्यांत आली हें आहे. यापैकी औद्योगिक कारखानदारीसाठीं ४४६ कंपन्यांनीं १२० कोटींसाठीं परवानगी मागितली होती, त्यांतून ४१८ कंपन्यांना १०९ कोटींचें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली; आणि इतर व्यवसायाच्या ४५१ कंपन्यांनीं ९० कोटींचे भांडवल उभारणीसाठीं केलेल्या अर्जांपैकी २६० कंपन्यांचे ५५ कोटींच्या भांडवलाचे अर्ज मंजूर करण्यांत आले. कारखानदार कंपन्यांचे बाबत फक्त सुमारे ७ कोटींचे भांडवलास परवानगी देण्यांत आली नाहीं परंतु इतर कंपन्यांचे बाबत सुमारे २६ कोटींच्या भांडवलास परवानगी नाकारण्यांत आली. संमति दिलेल्या सुमारें सव्वाबारा कोटि भांडवलाच्या ५४ कंपन्या हिंदी संस्थानांतील असून त्यापैकीं सुमारें १० कोटींचें भांडवल कारखानदारासाठीं व बाकीचें इतर व्यवसायासाठीं उभारलें जात आहे. हिंदी संस्थानांतील सुमारे १७ कंपन्यांना अडीच कोटींच्या भांडवलाबाबत परवानगी नाकारण्यांत आली. कारखानदारीसाठीं उभारल्या जाणाऱ्या भांडवलापैकी सुमारें ४१ कोटी चालू योजनांसाठी असून ६८ कोटी दीर्घकालीन योजनांसाठीं आहे. इतर व्यवसायांच्या कंपन्यांचें ३० कोटींचें भांडवल चालू योजनांसाठीं असून २५ कोटींचें दीर्घकालीन योजनासाठी आहे. सर्वांत अधिक भांडवल कापडासाठी उभारण्यांत येणार असून त्याचे खालोखाल सिनेमा–फील्मस्, नंतर इंजिनियरिंग, लोखंड व पोलाद निर्मिती आणि पुढें दगडाच्या खाणी यांचे क्रमांक लागतात.

---

## मद्रास शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. पुणें ५. )

चहा पिणें आरोग्याला हानिकारक आहे कीं नाहीं याचा विचार सोडून, चहाचे शेअर्स गुंतविणाराच्या दृष्टीनें कसे आहेत याचा विचार करणें जरूर आहे. चहाला पुढील कित्येक वर्षें मागणी वाढतच राहाणार आहे. एकंदर लोकसंख्या वाढत असल्यानें चहा पिणारांची संख्याही वाढत आहे. रशियासारखे देश अलीकडे चहाभक्त बनूं लागले आहेत. त्याचा फायदा या देशास मोठ्या प्रमाणांत मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं. सध्या आपल्या उत्पादनांपैकीं ऐंशी टक्के चहा एकटा इंग्लंड उचलतो, या दृष्टीनें मालाला कायमचें गिऱ्हाईक आहे. तसेंच या धंद्याच्या व्यवस्थेंत विशेष सुसूत्रता असून इंडियन टी असोशिएशन खप वाढविण्याचा अनेक वर्षें पद्धतशीर प्रयत्न करत आहे. आणि सरतेशेवटीं, चालू भावावर चहाच्या शेअर्सवर इतरांच्या मानानें निःसंशय समाधानकारक व्याज सुटत आहे. तेव्हां ज्यांना निव्वळ गुंतवणूकच करावयाची आहे त्यांच्याकरता निवडक चहाच्या शेअर्सचा तक्ता देत आहों:—

| नांव | मूळ किंमत रु. | आजचा साधारण भाव रु. | मूळ किंमतीवर दिलेले व्याज टक्क्यांत | | | आज पडणारें साधारण व्याज (कमाल) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९४३ | १९४४ | १९४५ | |
| चॅम्रा पकि | २ | ११ ५/१६ | ४० | ४० | ३० | ५% |
| हायलेबरिया | १० | ४५ १/२ | ३५ | ३७ १/२ | ३५ | ७ ३/४% |
| कलासा | ९ | १६ ९/१६ | ७ १/२ | १२ १/२ | १० | ५% |
| मलबार अग्रिकल्चर | १० | ९ १५/१६ | १० | ७ १/२ | ७ १/२ | ७ १/२% |
| नेलियांपथी | २ | १ १५/१६ | ३ १/८ | ६ १/४ | ७ १/२ | ७ १/२% |
| ऑक्टरलेमी व्हॅली | २ | १३ | ५० | २५ | २५ | ४% |
| नॉनसच | १० | २७ १/२ | १६ | १२ १/२ | १५ | ५ १/२% |
| पेरियाकरमलाई | ७ १/२ | ३८ १/४ | ३५ | ३५ | ३५ | ६ १/२% |
| पीरमेड | १० | ६३ | ४५ | २७ १/२ | ५० | ८% |

## बँकांच्या शाखावाढीवर नियंत्रण कां ?

### एका बँकेचें मासलेवाईक उदाहरण

" १९३८ सालीं हिंदुस्थानांत फक्त १,४७१ बँक कचेऱ्या होत्या. १९४२ अखेर त्यांची संख्या २,७१० झाली. १९४३ अखेर ती ३,४१३ होऊन १९४४ अखेर ती ४,५५० पर्यंत गेली. १९४५ अखेर बँकांच्या कचेऱ्या ५,२६६ झाल्या. " :— हिंदी फडणवीस, मि. लिकायत अलि खान.

" बिगर शेड्यूल बँकांच्या शाखांत फारच झपाट्यानें वाढ होत आहे. २४,००० रुपये वसूल भांडवलाच्या एक बँकेच्या ३४ शाखा आहेत ! ( ' जितका मनुष्य गरीब, तितकीं त्याला मुलें ज्यास्त':—श्री. अनंत शयनम् अयंगार ) आणि तिनें ५% डिव्हिडंड जाहीर केलें आहे ! तिनें आपल्या वसूल भांडवलाच्या एक तृतीयांशा इतकी खर्चाची रकम भांडवली खर्च म्हणून ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस घेतली आहे ! आपल्या ठेवी परत मिळत नाहींत, अशा तक्रारी ठेवीदारांकडून सरकारकडे आतां आल्या आहेत. जनतेची दिशाभूल होऊं नये आणि तिचें स्वतःच्या मूर्खपणापासून संरक्षण व्हावें, ह्या दृष्टीनें उपाययोजना करणें सरकारचें कर्तव्य आहे. ":—फडणीशी खात्याचे चिटणीस, श्री. के. जी. आंबेगांवकर.

**नव्या प्रॉमिसरी नोटा**— बदलून घेण्यासाठीं लोकांनीं १० सप्टेंबर, १९४६ पर्यंत दिलेल्या सरकारी रोख्यांचे बदली नवे सरकारी रोखे १८ नोव्हेंबर रोजीं तयार झाले.

**नवयुग चित्रपट लि., पुणें**—वरील कंपनीचें वसूल भांडवल २,२८,८२५ रुपये असून ताळेबंदांची बेरीज ९,५६,०३९ रुपये आहे. ३०-४-१९४६ अखेर संपलेल्या वर्षीं कंपनीस १७,७७८ रु. नफा झाला. त्यांतून प्राथमिक खर्चाचे ७,५४८ रु. व शेअर कमिशनचे २,१३९ रु. जिंदगीचे बाजूंतून काढून टाकून बाकी ८,०९१ रु. रकमेचा विनियोग शिलकी तोटा ( ३,४१,०९९ रु. ) कमी करण्याकडे केला जाईल. अहवालाचे वर्षीं कंपनीस स्टूडिओच्या भाड्याचे ७५ हजार रु. मिळाले. नगरचे रा. ब. देशमुख हे या कंपनीचे चेअरमन असून मेसर्स हंस पिक्चर्स लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. एस. आर. राजगुरू मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


# बँक ऑफ पूना लि.

अधिकृत भांडवल ... ... ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... रु. २५,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १२,५०,०००

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

शेठ मुरलीधर चतुर्भूज लोया, ( चेअरमन ) | शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी,
शेठ डी. आर. नाईक, जे. पी. ( व्हाइस चेअरमन ) | शेट फ्रामजी पी. पोचा
डॉ. ना. भि. परुळेकर, M.A., Ph.D. संचालक 'सकाळ' | शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी

हेड ऑफिस—४५५ रविवार पेठ, पुणें.

शाखा—( १ ) ३६१ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, ( २ ) १२ भवानी पेठ, पुणें. ( ३ ) टिळक चौक सोलापूर

## सेफ डिपॉझिट लॉकरची अल्प भाड्यांत सोय

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.···उद्योग-धंद्यांना व व्यापारवाढीला सवलत.
पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

जी. जी. साठे, मॅनेजर.

## पुण्यांतील सहकारी सप्ताहांतील व्याख्यानें

पुणें सेण्ट्रल को-ऑपेरेटिव्ह बँकेतर्फे आक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत यंदाचा सहकारी सप्ताह अत्यंत उत्साहानें साजरा करण्यांत आला.

सप्ताहाचें पहिलें व्याख्यान **डॉ. एन. व्ही. कानिटकर** यांनीं "सहकारी शेती कां सांघिक शेती" या विषयावर दिलें. त्यांनीं आपल्या व्याख्यानांत सहकारी अगर सांघिक शेती याबद्दल पाश्चात्य राष्ट्रांत विशेषतः रशिया देशांत, कोणते प्रयोग करण्यांत आले व ते यशस्वी कसे झाले याचें दिग्दर्शन केलें. **सौ. इंदिराबाई देवधर** यांचें "स्त्रीसमाजांत सहकारी तत्त्वांचा प्रसार" या विषयावर स्त्रियांसाठीं स्वतंत्र व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं मध्यम वर्गांतील स्त्रियांना सहकारी पद्धतीनें घरगुती धंदे करण्याबाबत कशी उपयुक्त कामगिरी करतां येईल याचें तपशीलवार व सूक्ष्म रीतीनें विवेचन केलें. **श्री. वैकुंठराय मेहता, अर्थमंत्री,** यांनीं कर्ज ऋणविमोचन कायदा, मार्केटिंग रेग्युलेशन कायदा, सेडूत धंद्यांना उत्तेजन व त्यांना द्यावयाच्या भांडवलाचा पुरवठा, प्रांतांतील पाणीपुरवठा या विषयांवर अधिकारयुक्त मतें निवेदन करून, सहकारी चळवळीच्या नैतिक बाजूचें महत्त्व श्रोत्यांस पटवून दिलें. **प्रा. रा. वि. ओतूरकर** यांनीं सहकारी चळवळीच्या विविध अंगांसंबंधीं तिऱ्हाईत या नात्यानें बऱ्याच सूचना व मतप्रदर्शन केलें. **श्री. के. व्ही जोशी** यांनीं आपल्या व्याख्यानांत युद्धोत्तर पुनर्घटनेंत संपत्तीची समवाटणी होईल हें उद्दिष्ट नजरेपुढें ठेवून त्या दृष्टीनें शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी सहकारी चळवळीचा अवलंब करण्यांत यावा असें सांगितलें, **कॅ. एस्. पी. मोहिते** यांचें "सामुदायिक शेती" या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान झालें. सांघिक शेती, सरकारनें पुरस्कारलेली शेती, एकत्रित शेती व सहकारी शेती हे शेतीचे चार प्रयोग पाश्चात्य राष्ट्रांत कोठें व कसे यशस्वी झाले याबद्दल त्यांनीं मार्मिक विवेचन केलें व हिंदुस्थानांत हा प्रयोग जॉईंट फार्मिंग व बेटर फार्मिंग या पद्धतीनें सुरू करणें आवश्यक आहे असें प्रतिपादन केलें.

### समारोप

शनिवार दि. २ ला सहकारी सप्ताहाचा समारोप व आंतरराष्ट्रीय सहकारी-दिन **प्रि. द. गो. कर्वे** यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. प्रथम श्री. पांडव व श्री. कुंभारे यांनीं अनुक्रमें आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था व बँकेचे चेअरमन यांचे संदेश सभेस वाचून दाखविले. नंतर तालुक्याच्या ठिकाणीं साजऱ्या केलेल्या दिनाबद्दल श्री. ओगले, श्री. रबडे, श्री. भानू यांनीं सभेस माहिती सांगितली. नंतर श्री. शं. रा. भागवत, श्री. दा. वि. गोखले, श्री. दा. वा. पोतदार व रावसाहेब य. द. सोले यांचीं सहकारी चळवळीच्या विविध उपांगासंबंधीं उद्बोधक व चळवळीच्या भवितव्याबद्दल कळकळ व्यक्त करणारीं भाषणें झालीं. प्रि. कर्वे यांनीं समारोपाच्या भाषणांत आतां आपलेंच लोकसत्ताक सरकार अस्तित्वांत असल्यामुळें सहकारी चळवळ योग्य पायावर उभारून तिच्यामार्फत शेतकऱ्याचें जास्तीत जास्त कल्याण होईल अशा तऱ्हेनें तिचा उपयोग करून घेणें हें आपलें कर्तव्य आहे असें सांगितलें. श्री. चितळे यांनीं आभार मानल्यानंतर सप्ताह-समारंभ समाप्त झाला.

---


### तासगांव अर्बन को. बँक लि.


तासगांव (सातारा) तालुक्यांत दुष्काळ व प्रथम २-३ महिने प्लेग असतांहि ह्या बँकेच्या व्यवहारांत वाढ झाली आहे. कर्जांत घट होऊनहि सिक्युरिटीजच्या खरेदी-विक्रींत १,०२७ रु. नफा झाल्यामुळें एकूण नफा २,५४० रु. झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें.

---

### मि. मेहेक्री—रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर

रिझर्व्ह बँकेचे एक डेप्युटि गव्हर्नर, मि. वजाहत हुसेन, हे कांहीं महिन्यांपूर्वी मृत्यु पावले. त्यांच्या जागीं मि. एम. जी. मेहेक्री, ह्यांची नेमणूक झाली आहे. म्हैसूर व काश्मीर संस्थानांत त्यांनीं मोठ्या हुद्यावर कामें केलेलीं आहेत.


पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १२।११।४६ | बुधवार १३।११।४६ | गुरुवार १४।११।४६ | शुक्रवार १५।११।४६ | सोमवार १८।११।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६७५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २९२५—० | | | २९४३-१२ | २९८२—८ |
| ४८०; ३.७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५३०—० | | | ५३३—० | ५३८—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २९६५—० | बाजार बंद | बाजार बंद | २९६०—० | २९६२—८ |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९४२—० | | | ९४७—० | ९५९—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७६३—० | | | ७७०—० | ७७२—० |
| ४४३-८; ३६० | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४२३—० | | | ४२४—० | ४३०—० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४१९—० | | | ४२०—० | ४२४—० |
| ३३५; २८३-८ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३९७—० | | | ३९८—० | ४०१—० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४४१—८ | | | ४५५—० | ४५९—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—६ | | | ५—६ | ५—६ |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२—३ | | | २२—९ | २२-१० |
| ३-१०; २९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४-१५ | | | ५—० | ५-०-६ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७९६—४ | | | ८०२—८ | ८०७—८ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४५—८ | | | २४६—८ | २४७—८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३६५—८ | | | ३६८—० | ३७०—० |
| ५९२-८; ५१०-८ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ७२५—० | | | ७३१—४ | ७३६—४ |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४८—९ | | | ४८-१३ | ४९-१० |

**"अधिक धान्य पिकवा" मोहिमेचें यश**—मुंबई प्रांतांतील "अधिक धान्य पिकवा" मोहिमेवर झालेला खर्च, त्या मोहिमेखालील क्षेत्र आणि उत्पादनांत झालेली वाढ ह्यांचे आंकडे खाली दिले आहेत:—

| वर्ष | रकम (रु.) | क्षेत्र (एकर) | वाढलेलें उत्पादन (टन) |
|---|---|---|---|
| १९४३-४४ | ६,९३,००० | ११,६७,५०० | १,४६,४०० |
| १९४४-४५ | १९,६७,००० | २४,७०,११० | ४,०६,१०० |
| १९४५-४६ | ३३,४३,३०० | ५५,२७,८०० | ४,६०,००० |

**रेल्वेनें केलेली नुकसानभरपाई**—वहातुकीसाठीं स्वीकारलेला माल नाहींसा होणें, खराब होणें, इत्यादि कारणांकरितां हिंदी रेल्वेजनीं १९४५-४६ मध्यें १ कोटि, ५९ लक्ष रुपयांची नुकसान भरपाई केली. १९४१-४२ मधील तत्सम आकडा फक्त ७ लक्ष, ८७ हजार रुपये इतकाच होता. वहातुकींत झालेली वाढ, गुड्स् व पार्सल ऑफिसांतील गर्दी, वापरलेलीं खराब वेग्नें, लेबलें लावण्यांत दक्षतेचा अभाव, चोर्यांचा सुळसुळाट, ब्लॅक आंउटमुळें स्टेशनांवर भरपूर उजेडाचा अभाव, हंगामी नोकरांपैकीं कांहींची नालायकी, इत्यादि कारणांमुळें नुकसान भरपाईचा आंकडा एवढा मोठा झाला, असें असेंब्लींत सांगण्यांत आलें.

**स्वीडन-रशिया व्यापारी करार**—स्वीडन आणि सोव्हियट रशिया यांच्यांत नुकताच एक व्यापारी करार करण्यांत आला. सदर करारान्वयें स्वीडननें सोव्हिएट रशियाला १ अब्ज क्रोनर पर्यंत माल ५ वर्षांच्या मुदतींत पतीवर देण्याचें कबूल केलें आहे. स्वीडनमधील कारखान्यांतून तयार होणारी यंत्रसामुग्रीच मुख्यतः घेण्याचा रशियाचा विचार आहे. स्वीडननें रशियाशीं एकतर्फी व्यापारी करार केल्याबद्दल अमेरिकेनें तक्रार केली होती. परंतु आपणास वाटतील तसे सोईचे व्यापारी करार करण्याचा स्वीडनला हक्क आहे असें उत्तर अमेरिकेला देण्यांत आलें. पूर्व युरोप व उत्तर युरोपांतील राष्ट्रें यापुढें रशियाशीं अधिक प्रमाणावर व्यापार करूं लागणार अशीं चिन्हें दिसतात.




महाराष्ट्र एजंट:—मे. जयप्रकाश आणि कं., ३५१४ सदाशिव पेठ, पु
( गांवोगांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत. )



बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित

# दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.

गोया गेट, बडोदा

★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.

★ १,२,३ व ४ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.

★ सुप्रसिद्ध "तेज" बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.

मॅनेजिंग एजंटस :

**पानसे आणि कंपनी,**

गोया गेट, बडोदा.

किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.

या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

शेअर्स विकणें आहेत:—

गोवर्धन डेअरी फार्म्स लि., गोवर्धनवाडी, पुणें १.

**साड प्रेग युटेरो**

गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक

द. कृ. साड, ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड, (चेंबूर)

**डोंगरे यांच्या बालामृतानें**

अशक्त मुलें सशक्त होतात.

चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

**पंढरीनाथ** ब्रिलिअन्टाईन वापरा







आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) | विश्वास (चार बैली) |
| किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) | वासुदेव (दोन बैली) |
| किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) | राजा (एक बैली) |

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ९२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.